**<u>विशेष दिवाणी दावा क्र. ४७४/२०२४</u>**
**<u>निशाणी क्र. १ वरील आदेश</u>**

दावा अवलोकन केला. दावा परिच्छेद ६, ७ व ८ यामध्ये दाव्याचे मुल्यांकन प्रत्येकी १,०००/- यावर करुन रक्कम रुपये १२००/- चा कोर्ट फी स्टॅम्प भरणा केला आहे. दाव्याचे मुल्यांकन रक्कम रुपये पाच लाख किंवा त्यापेक्षा जास्त नाही. अधिक्षक, दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, पनवेल यांना निर्देशित करणेत येते की, दाव्यास विशेष दिवाणी दावा क्रमांक का देणेत आला याबाबत स्पष्टीकरण सादर करावे.

सही/-

पनवेल. (कृ. मु. सोनवणे)
दिनांक :११-१२-२०२४. २रे सह दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर, पनवेल

**<u>विशेष दिवाणी दावा क्र. ४७४/२०२४</u>**
**<u>निशाणी क्र. ५ वरील आदेश</u>**

अर्ज व कागदपत्र वाचले. वादीचे विद्वान वकिलांचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादी याचे म्हणणे ऐकणे आवश्यक आहे. सबब, प्रतिवादी यांना नोटीस जारी करणेत येत आहे. विशेष बेलीफ व तात्काळ प्रोसेस याद्वारे नोटीस काढणेत यावी. वादीने विशेष बेलीफ भत्ता नियमाप्रमाणे भरणा करावा. पुढील तारीख १२/१२/२०२४.

सही/-

पनवेल. (कृ. मु. सोनवणे)
दिनांक :११-१२-२०२४. २रे सह दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर, पनवेल